# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं.

**दिनांक : 12.10.2026** **वार : सोमवार**

---

## ठळक बातम्या

1. जगासमोर उद्भवणाऱ्या नवनव्या आव्हानांवर कल्पकतेनं तोडगा शोधण्याचं काम भारतातली युवा पिढी करेल; पंतप्रधानांचा विश्वास.
2. शांततेनं एकत्र येणाऱ्या लोकांना बेकायदेशीररित्या ताब्यात घेऊ नका; सर्वोच्च न्यायालयाचे प्रशासनाला आदेश.
3. सौदी अरेबियातल्या रियाध विमानतळावर दुसऱ्यांदा हल्ला.
4. एकमेकांच्या ऊर्जा प्रकल्पांवर हल्ले न करण्याबाबत रशिया आणि युक्रेन यांच्यात सहमती झाल्याचं अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचं वक्तव्य.
5. नेमबाजी, बॅडमिंटनसह क्रिकेटमध्येही भारतीय खेळाडूंचा विजय.

## सविस्तर बातम्या

**पंतप्रधान युवा पिढी**

जगासमोर उद्भवणाऱ्या नवनव्या आव्हानांवर कल्पकतेनं तोडगा शोधण्याचं काम भारतातली युवा पिढी करेल असा विश्वास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला आहे. ते काल चेन्नई इथं जयगोपाल गरोडीया हिंदू विद्यालयाच्या सुवर्ण महोत्सव सोहळ्यात बोलत होते. सध्याचं युग युवा पिढीचं आहे असं म्हणत या पिढीच्या नवनवीन कल्पना आणि मेहनत भारताचं आणि जगाचंही भविष्य घडवतील असं मोदी म्हणाले. शिक्षण घेण्याबरोबरच ते व्यवहारात उपयोगातही आणलं पाहिजे असं सांगून त्यांनी युवा पिढीला मोठी स्वप्नं पाहण्याचं, वेगळा विचार करण्याचं आणि निर्भयपणे काम करण्याचं आवाहन केलं. आधुनिक नवोन्मेषाला आपल्या सांस्कृतिक वारसाची जोड देऊन युवा पिढी प्रगतीशील, स्वावलंबी राष्ट्र घडवू शकते असं पंतप्रधान म्हणाले.

**पंतप्रधान**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल तमिळनाडूमध्ये विविध विकास प्रकल्पांचं उद्घाटन आणि भूमीपूजन केलं. यामध्ये रस्ते, रेल्वे, बंदर, पेट्रोल तसंच वैज्ञानिक संशोधन प्रकल्पांचा समावेश आहे. आयआयटी मद्रास इथं झालेल्या या कार्यक्रमाला तमिळनाडूचे मुख्यमंत्री सी. जोसेफ विजय उपस्थित होते.

या प्रकल्पांमुळे राज्यातली संपर्क व्यवस्था सुधारेल, उद्योग आणि व्यापाराला चालना मिळेल तसंच युवकांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण होतील असा विश्वास पंतप्रधानांनी व्यक्त केला.

**सर्वोच्च न्यायालय**

शांततेनं एकत्र येणाऱ्या लोकांना बेकायदेशीररित्या ताब्यात घेऊ नका आणि वाहतूक नियमांचं पालन करत लोकांना मुक्तपणे वावरण्याची परवानगी द्या असे आदेश सर्वोच्च न्यायालयानं प्रशासनाला दिले आहेत. दिल्लीतल्या तात्पुरत्या वाहतूक अडथळ्यांचा आढावा घेण्याची सूचना करुन मेट्रो सेवा, इंटरनेट सेवाही सुरळीत सुरू राहील याची दक्षता घ्यावी असे आदेश

न्यायालयानं केंद्र सरकारला दिले आहेत. न्यायालयाच्या आदेशाचा अवमान केल्याप्रकरणी प्रशासनाविरोधात दाखल करण्यात आलेल्या याचिकेवरील सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयानं हे आदेश दिले.

**सीजेपी आंदोलन**

दिल्ली विमानतळावर ताब्यात घेतलेले सीजेपी नेते अभिजित दिपके, आशुतोष रांका आणि सौरव दास यांना काल कार्यकारी दंडाधिकाऱ्यांसमोर हजर केल्यानंतर एका वर्षासाठी शांततेचा भंग न करण्याच्या अटीवर त्यांची सुटका करण्यात आली. पुन्हा आंदोलन करणार नाही, अशा अर्थाचं कोणतंही हमीपत्र आपण दिलेलं नाही, असं कॉकरोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दिपके यांनी नागपूर विमानतळावर वार्ताहरांशी बोलताना सांगितलं.

दरम्यान, सीजेपीच्या आंदोलनाच्या समर्थनार्थ मुंबईतही आंदोलन करण्यात आलं. परवानगी न घेता आंदोलन करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करणार असल्याचं पोलिसांनी सांगितलं.

**आंदोलन-स्थगित**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कारभाराच्या विरोधात पुण्यात गेले काही दिवस सुरू असलेलं परिक्षार्थींचं आंदोलन काल स्थगित करण्यात आलं. राज्य सरकारचे प्रतिनिधी म्हणून मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी काल या आंदोलकांची भेट घेतली. एमपीएससी परीक्षांमध्ये झालेल्या गैरप्रकारांची चौकशी करण्यासाठी निवृत्त न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन केली जाईल, तसंच या समितीमध्ये एफ. डी. ए. चे आयुक्त तुकाराम मुंडे यांचाही समावेश केला जाईल, अशी माहिती भोसले यांनी आंदोलकांना दिली; त्यानंतर हे आंदोलन स्थगित करण्यात आलं.

**रियाध हल्ला**

सौदी अरेबियातल्या रियाध विमानतळावर काल दुसऱ्यांदा हल्ला झाला. या हल्ल्यात एकाचा मृत्यू झाला असून 11 जण जखमी झाल्याची माहिती सौदीच्या लष्करी प्रवक्त्यानं दिली आहे. किंग खालीद आंतरराष्ट्रीय विमानतळावरील प्रवासीकक्षात एक प्रोजेक्टाइल धडकल्यामुळे तिथं आग लागली. परवा शनिवारी याच विमानतळावर झालेल्या हल्ल्यात 13 जणांचा मृत्यू झाला होता आणि 308 जण जखमी झाले होते.

येमेनच्या हुथी बंडखोरांनी हे हल्ले केल्याचं मान्य केलं असून सौदी अरेबियातील विमानतळांचा वापर करू नये असा इशारा विमान कंपन्यांना आणि प्रवाशांना दिला आहे. अनेक देशांच्या नेत्यांनी तसंच संयुक्त राष्ट्रांचे सरचिटणीस अँटोनिओ गुटेरस यांनी या हल्ल्यांचा निषेध केला आहे.

दरम्यान, या हल्ल्यांमध्ये एका भारतीय व्यक्तीचा मृत्यू झाल्याची माहिती रियाधमधल्या भारतीय दूतावासानं दिली आहे. रियाधमधल्या हल्ल्यानंतर तिथला भारतीय दूतावास स्थानिक अधिकाऱ्यांच्या संपर्कात असून जखमी भारतीयांची विचारपूस करत आहे असं परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी सांगितलं.

**ट्रम्प-रशिया-युक्रेन**

एकमेकांच्या ऊर्जा प्रकल्पांवर हल्ले न करण्याबाबत रशिया आणि युक्रेन सहमत झाले असून युद्धविराम तात्काळ प्रभावानं लागू झाला आहे असं अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी समाज माध्यमावरील संदेशात म्हटलं आहे. याबाबतीत अधिक तपशील मात्र त्यांनी दिलेला नाही.

सर्वांसाठी एक चांगली बातमी म्हणून या घोषणेचं युक्रेन स्वागत करतो असं युक्रेनचे अध्यक्ष वोलोडिमिर झेलेन्स्की यांनी म्हटलं आहे. रशियानं जर युक्रेनच्या ऊर्जा प्रकल्पांवरील हल्ले थांबवले, तर युक्रेन रशियन तेल शुद्धीकरण प्रकल्पांवरील हल्ले थांबवण्यास तयार आहे असं एका मुलाखतीत त्यांनी सांगितलं. रशियानं मात्र यावर अद्याप कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नाही.

**नेपाळ पूर**

नेपाळमधल्या बुधी गंडकी नदीला काल पहाटे अचानक आलेल्या पुरामुळे गोरखा जिल्ह्यात अनेक घरं आणि पूल वाहूत गेले असून काही जलविद्युत प्रकल्पांचंही मोठं नुकसान झालं आहे. आतापर्यंत 82 जणांना बचाव पथकांनी वाचवलं आहे तर 5 जण अजूनही बेपत्ता आहेत अशी माहिती तिथल्या राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणानं दिली.

गोरखा जिल्ह्यात झालेल्या भूस्खलनानंतर तयार झालेला तात्पुरता बांध फुटल्यामुळे नदीला अचानक पूर आला असल्याची शक्यता आहे असं आंतरराष्ट्रीय एकात्मिक पर्वतीय विकास केंद्रानं म्हटलं आहे.
दरम्यान, मानस्लु गिर्यारोहण मार्गाकडे जाणारे अनेक पर्यटक या पुरामुळे अडकून पडले आहेत.

**आफ्रिका नौका अपघात**

पूर्व आफ्रिकेतील जिबूती किनारपट्टीजवळ 305 स्थलांतरितांना घेऊन जाणारी एक नौका उलटल्यानं 15 मुलांसह एकंदर 139 लोकांचा मृत्यू झाला आहे, असं आंतरराष्ट्रीय स्थलांतर संघटनेनं म्हटलं आहे. मागच्या आठवड्यात 8 तारखेला ही घटना घडली. शोध आणि बचाव कार्य सुरू असून 84 लोक अजूनही बेपत्ता आहेत त्यामुळे मृतांची संख्या वाढण्याची शक्यता आहे असं या संस्थेनं म्हटलं आहे. 80 हून अधिक लोकांना वाचवण्यात आलं आहे. हे सर्व इथिओपियाचे नागरिक आहेत.

ही नौका जिबूती ते येमेन दरम्यान असलेल्या 'बाब-अल-मंदेब सामुद्रधुनी'तून प्रवास करत होती. या नौकेचा मार्ग धोकादायक असून आफ्रिकेतील 'हॉर्न ऑफ आफ्रिका'या भागातील हजारो लोक कामाच्या शोधात आखाती देशांपर्यंत पोहोचण्यासाठी या मार्गाचा वापर करतात.

**नेमबाजी**

आंतरराष्ट्रीय नेमबाजी क्रीडा संघटनेच्या इजिप्तमध्ये कैरो इथं झालेल्या रायफल आणि पिस्तूल विश्वकरंडक स्पर्धेत भारताच्या उधयवीर सिधूनं पुरुषांच्या 10 मीटर एअर पिस्तूल प्रकारात सुवर्णपदक मिळवलं.
या स्पर्धेत ऑलिम्पिक पदक विजेते स्वप्नील कुसाळे आणि सरबजोत सिंग यांच्यासह 24 भारतीय नेमबाज सहभागी झाले आहेत.

**बॅडमिंटन**

तुर्कीये इंटरनॅशनल चॅलेंज बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या अनमोल खर्ब हिनं महिला एकेरीचं विजेतेपद मिळवलं. तिनं अंतिम सामन्यात आकर्षी कश्यप हिचा 21-11, 21-14 असा सरळ गेम्समध्ये पराभव केला. अनमोलचं हे तिसरं आंतरराष्ट्रीय विजेतेपद आहे.

पुरुष दुहेरीत भारताच्या सूरज आणि निकोलस यांच्या जोडीला उपविजेतेपदावर समाधान मानावं लागलं.

**क्रिकेट**

वेस्ट इंडीजविरुद्धचा तिसरा वीस षटकांचा क्रिकेट सामना काल भारतानं 14 धावांनी जिंकला. इंदोर इथं झालेल्या या सामन्यात नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करणाऱ्या भारतीय संघानं 20 षटकांत 223 धावा केल्या. अभिषेक शर्मानं 30 चेंडूत 69 धावा केल्या. मात्र निर्धारित 20 षटकांत वेस्टइंडीजचे फलंदाज 209 धावा करू शकले. वेस्ट इंडीजचे 3 फलंदाज बाद करणारा अर्शदीप सिंग सामनावीर ठरला. पाच सामन्यांच्या या मालिकेत भारत 2-1 नं आघाडीवर आहे.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.**